आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in

बुधवार दिनांक 18/02/२०२६

METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 64 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# अल्पसंख्याक संस्था दर्जा प्रमाणपत्र प्रकरणाची सखोल चौकशी करा-सुनेत्रा पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : अल्पसंख्याक समाजासाठी असलेला निधी प्रत्येक घटकाला सम प्रमाणात आणि पारदर्शकपणे वितरित व्हावा, तसेच विभागाचे कामकाज अधिक लोकाभिमुख व समाजाप्रती उत्तरदायी राहण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या. तसेच शाळांना चुकीच्या पद्धतीने अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आलेल्या प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.**



उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्याक विकास विभागाची आढावा बैठक सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे पार पडली. यावेळी अल्पसंख्याक विकास विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सहसचिव मनोज जाधव, उपसचिव मि. प. शेणॉय, अवर सचिव सारंगकुमार पाटील, अवर सचिव जहांगीर खान, अवर सचिव विशाखा आढाव तसेच अवर सचिव मेघना शिंदे उपस्थित होत्या.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या की, राज्यातील अल्पसंख्याक समुदायाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी शासन कटिबद्ध आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ठरवून दिलेल्या ध्येयधोरणांनुसारच विभागाची वाटचाल व्हावी. सच्चर समितीच्या शिफारशीनुसार 21 फेब्रुवारी 2008 रोजी राज्यात स्वतंत्र अल्पसंख्याक विकास विभागाची स्थापना करण्यात आली. या विभागामार्फत शैक्षणिक शिष्यवृत्ती, वसतिगृहे, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांच्या कर्ज योजना, जैन आर्थिक विकास महामंडळाच्या थेट कर्ज व व्याज परतावा योजना, स्वयंसहायता बचतगट, कौशल्य विकास व पायाभूत सुविधा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

मौलाना आझाद महामंडळाच्या शैक्षणिक कर्जाची मर्यादा 5 लाखांवरून 20 लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आल्याचे सांगून, या योजनेचा लाभ प्रत्यक्ष गरजूंनाच मिळेल याची काटेकोर दक्षता घ्यावी, असेही त्यांनी बजावले. तसेच राज्यातील 'डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना' अंतर्गत पायाभूत सुविधांचे अनुदान 2 लाखांवरून 10 लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आले असून, पात्र संस्थांची निवड करताना पूर्ण पारदर्शकता राखावी, असे निर्देश दिले.

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात येणारी वसतिगृहे तातडीने पूर्ण करून कार्यान्वित करावीत. अल्पसंख्याक बहुल क्षेत्रातील विकासकामांसाठी वितरित होणाऱ्या निधीचे समप्रमाणात वाटप होऊन कामांचा उत्कृष्ट दर्जा राखला जावा, याची जबाबदारी विभागाने घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

नांदेड, सोलापूर आणि मालेगाव येथील उर्दू घरे कार्यान्वित असून, इतर प्रस्तावित उर्दू घरांची कामेही विहित मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

# खासदार श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. शहरातील गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. आता पायीपीठ थांबणार असून सायकलवर शाळेत जाता येणार असल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.**



या प्रसंगी महापालिकेतील शिवसेनेचे गटनेते विश्वजित बारणे, नगरसेवक निलेश बारणे, माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, बाळासाहेब ओव्हाळ, धनाजी बारणे, धनाजी विनोदे, शांताराम भोंडवे, नंदू जाधव, माऊली घोगरे, बाळासाहेब वाघमोडे उपस्थित होते. खासदार श्रीरंग बारणे यांचा वाढदिवस दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला जातो. समाजातील गरजवंताचा शोध घेऊन त्यांना विविध माध्यमातून मदत केली जाते. विद्यार्थ्यांना शालेय मदत करण्यासाठी खासदार बारणे यांचा नेहमी आग्रह असतो. त्यातूनच यंदा शहरातील शाळेत पायी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेतला. त्यांची शाळेत जाण्याची अडचण ओळखून सायकल वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार शहरातील गरजू विद्यार्थी, विद्यार्थिनींना सायकलचे वाटप करण्यात आले. त्यामुळे आता विद्यार्थ्यांची पायीपीठ थांबणार असून सायकलवर शाळेत जाता येणार आहे. वेळेत सायकलवर जाता येईल. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छा स्वीकारण्याचा दिवस नसतो, तर समाजाला काहीतरी परत देण्याची संधी आहे.

याच भावनेतून वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला.

शिक्षणासाठीचे प्रत्येक पाऊल सोपे व्हावे, वेळ वाचावा आणि स्वप्नांच्या दिशेने त्यांची वाट अधिक वेगाने पुढे जावी. विद्यार्थ्यांच्या प्रगतीतच आपला खरा आनंद आहे.

# थेरगाव येथील उर्दू माध्यम दहावीचा निरोप समारंभ उत्साहात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहरातील थेरगाव परिसरातील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक विद्यालय, थेरगाव येथे उर्दू माध्यमातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रम शबनम न्यूज वृत्तसंस्थेच्या संपादिका शबनम सय्यद यांच्या शुभहस्ते आणि शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब राठोड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांचा उत्साह आणि आनंद ओसंडून वाहताना दिसत होता.**



कार्यक्रमास शाळेच्या पर्यवेक्षिका राऊत मॅडम, जाधव मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांनीच केले होते. त्यांना उर्दू माध्यमिक विभागाचे आकिब सर, मोरे सर, तहेमीना मॅडम आणि सुमय्या मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने करण्यात आली. विद्यार्थिनी अक्सा आणि मिस्बाह यांनी सुंदर स्वागत गीत सादर केले. तर आसना, आर्शिया, आदीबा व अश्मीरा यांनी शाळेतील आपल्या आठवणी जागवत भावनिक वातावरण निर्माण केले.

प्रमुख पाहुण्या शबनम सय्यद यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "दहावीच्या परीक्षेला आनंदाने आणि आत्मविश्वासाने सामोरे जा. कोणताही ताण न घेता सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. शिक्षण हे आयुष्य घडवणारे साधन आहे. मिळालेल्या वेळेचा योग्य उपयोग करून स्वतःला घडवा."

अध्यक्षस्थानावरून बोलताना मुख्याध्यापक बाळासाहेब राठोड यांनी विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध आणि आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जाण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या शालेय प्रवासातील अनेक आठवणी त्यांनी यावेळी जाग्या केल्या.

यावेळी शिक्षक मोरे सर, तहेमीना मॅडम, सुमय्या मॅडम आणि राऊत मॅडम, जाधव मॅडम यांनीही मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना येणाऱ्या दहावी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. समारंभ आनंद, उत्साह आणि भावनिक क्षणांनी परिपूर्ण ठरला. सूत्रसंचालन सानिया, सुमैय्या यांनी केले.

# संतोषनगर–थेरगाव भुयारी मार्गावर बेदरकार टेम्पोचालकाचा धुमाकूळ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संतोषनगर–थेरगाव भुयारी मार्गावर 15 फेब्रुवारी 2026 रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास बेदरकारपणे तीन चाकी टेम्पो चालवून दुचाकीस्वारास धडक दिल्याची घटना घडली.**




या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून टेम्पोचालकाविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी आशिष पुंजाराम खरात (वय 33, व्यवसाय नोकरी, रा. कृष्णा रेसिडेन्सी, काळेवाडी, पुणे) हे कामावरून घरी जात असताना त्यांच्या मोपेड (एमएच 14 जेएन 2195) ला भरधाव वेगात आलेल्या तीन चाकी टेम्पोने धडक दिली. संबंधित टेम्पो (एमएच 14 जेपी 3255) चालकाने वाहतूक नियमांचे उल्लंघन करत अविचारी व निष्काळजीपणे वाहन चालवले, असे तक्रारीत नमूद आहे.

या अपघातामुळे फिर्यादी यांच्या वाहनाचे नुकसान झाले असून त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. घटनेनंतर वाकड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच मोटार वाहन कायद्यानुसार संबंधित टेम्पोचालकाविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

प्रकरणाचा पुढील तपास वाकड पोलीस करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 18/02/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे आणि वासुदेव बळवंत फडके यांना अभिवादन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी "जगेन तर देशासाठी आणि मरेन तर देशासाठी" अशी क्रांतिकारी घोषणा करणारे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील थोर क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे आणि त्यांना साथ देणारे क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे देशासाठी दिलेले योगदान देशभक्तीची सतत प्रेरणा देत राहील असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे आणि वासुदेव बळवंत फडके यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चिंचवड स्टेशन येथील पुतळ्यास तसेच महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीमधील प्रतिमेस महापालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले,त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्या अनुराधा गोरखे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप, उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते संदीपान झोंबाडे, नितीन घोलप,संजय धुतडमल, राजू आवळे, भाऊ कसबे, बाळासाहेब रसाळ, शिवाजी खडसे, रवींद्र वाघमारे, नाना कांबळे, नामदेव रिटे,मारुती सोनटक्के, बाळासाहेब खंदारे, अनिकेत साळवे, जितेंद्र मोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले की, स्वतः युध्दनितीनिपुण असलेल्या आणि देशभक्तीने प्रेरित झालेल्या क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांनी हजारो क्रांतिकारकांची फौज तयार केली आणि इंग्रजाविरुध्द मोठा लढा दिला तर क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनी परकीय सत्तेविरुद्ध ठाम भूमिका घेत स्वातंत्र्याच्या विचारांना नवे बळ दिले आणि देशनिष्ठेचा आदर्श निर्माण केला,या दोन्ही महापुरूषांचे योगदान देशातील स्वातंत्र्याच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखे असून त्यांच्या देशभक्तीचा,महान कार्य कर्तृत्वाचा वारसा जोपासणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे महापौर लांडगे यांनी सांगितले.

# आळंदी-खेड रोडवर शस्त्रासह फिरणारा तरुण पोलिसांच्या जाळ्यात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

खेड (पुणे) – आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इंद्रायणी नदी पुलाजवळ, सिद्ध बेट चौकामध्ये 16 फेब्रुवारी 2026 रोजी रात्री सव्वा अकराच्या सुमारास शस्त्र बाळगून फिरणाऱ्या तरुणाला पोलिसांनी अटक केली.

बंदी आदेशाचे उल्लंघन करत लोखंडी गुप्ती व महागडी दुचाकी बाळगल्याप्रकरणी संबंधित तरुणाविरोधात भारतीय शस्त्र अधिनियम व महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव ज्ञानेश्वर विठ्ठल गिरी (वय 35, रा. गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड) असे असून तो गंडाविरोधी पथकाच्या रडारवर होता. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीवर यापूर्वी बंदी आदेश लागू असतानाही त्याने आदेशाचे उल्लंघन केले. तपासादरम्यान त्याच्याकडून सुमारे 500 रुपये किमतीची लोखंडी गुप्ती तसेच अंदाजे 30 हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची होंडा स्प्लेंडर प्लस दुचाकी (क्र. MH 14 JG 1410) जप्त करण्यात आली आहे.

या कारवाईदरम्यान आरोपीसोबत असलेला रोहन अनिल दोडे (वय 20, रा. देहूफाटा, आळंदी देवाची, ता. खेड, मूळ रा. घोडपवाडी, ता. आंबेजोगाई, जि. बीड) यालाही ताब्यात घेण्यात आले असून तो सध्या अटकेत आहे.

या प्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम 1959 चे कलम 4(25) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 37(1)(3) सह 135 अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 18/02/२०२६

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महापौर रवी लांडगे यांचा “माझा फार्मासिस्ट माझा अभिमान” गौरवचिन्हाने सन्मान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून केमिस्ट व्यावसायिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी, नियमावली सुलभ करण्यासाठी आणि आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याचा माझा प्रयत्न राहील.



शहराच्या सर्वांगीण विकासात आरोग्य क्षेत्राला प्राधान्य देत, प्रशासन आणि व्यावसायिक यांच्यात समन्वय वाढविण्यावर भर देण्यात येईल. पिंपरी चिंचवड केमिस्ट असोसिएशनतर्फे ‘माझा फार्मासिस्ट, माझा अभिमान’ या गौरवचिन्हाने केलेला सन्मान माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी आहे. मी स्वतः फार्मासिस्ट असल्यामुळे आरोग्यसेवेच्या क्षेत्रातील जबाबदाया आणि आव्हाने जवळून अनुभवलेली आहेत. समाजाच्या आरोग्य सुरक्षेत केमिस्ट बंधू-भगिनींची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. हा सन्मान माझा नसून संपूर्ण केमिस्ट समुदायाचा आहे. आपण दाखवलेला विश्वास आणि प्रेम हेच माझ्या कार्याची खरी प्रेरणा आहे. अशी भावना महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केली.

नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकीत महापौरपदी निवड झाल्याबद्दल नवनिर्वाचित महापौर रवि लांडगे यांचा पिंपरी चिंचवड केमिस्ट असोसिएशनतर्फे सन्मान करण्यात आला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महानगरपालिकेतील प्रशासकीय भवनातील महापौर कक्षात केमिस्ट असोसिएशनतर्फे महापौर रवि लांडगे यांचा “माझा फार्मासिस्ट, माझा अभिमान” या गौरवचिन्हाने सन्मान करण्यात आला.यावेळी आपल्या भावना व्यक्त करतांना महापौर रवि लांडगे बोलत होते.

या प्रसंगी पुणे जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष विवेक तापकीर, पीआरओ सचिन धोका, पिंपरी चिंचवड केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष रवी पवार, सचिव चेतन शिंगवी, खजिनदार नंदू पानसरे, भोसरी केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष वसुदेव चव्हाण, संघटक राजेश टोपे, किरण थोरवे, अंकुश परांडे, उमेश देसाई, टाव्हरे, महिला संघटकमोहिनी कोळी, पवन टिंगरे, विशाल टेकाळे, विनोद टोपे तसेच मोठ्या संख्येने केमिस्ट बंधू-भगिनी उपस्थित होते.

फार्मासिस्ट म्हणून कार्यरत असलेल्या महापौर लांडगे यांच्या निवडीमुळे पिंपरी चिंचवडमधील औषध विक्रेते व केमिस्ट बंधू-भगिनींमध्ये आनंदाचे वातावरण असून, हा क्षण केमिस्ट क्षेत्रासाठी अभिमानास्पद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# शासनाच्या समितीकडून निळ्या आणि लाल पूररेषांचे पुन:सर्वेक्षण–आमदार शंकर जगताप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भात केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये नद्यांलगतच्या निळ्या व लाल पुररेषेचे नव्याने पुनर्वेक्षण करण्यासाठी शासनाकडून नियमावली तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी सरकारने पिंपरी चिंचवडसह 12 सदस्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली. दरम्यान गठीत केलेली समिती पुढील दोन महिन्यात शासनाला अहवाल सादर आहे.**

पिंपरी चिंचवडसह राज्यात प्रमुख शहरांमध्ये नद्यालगतच्या निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भातले प्रश्न प्रलंबित आहेत. यामुळे नागरिकांना अडचणी निर्माण होत होत्या. पिंपरी चिंचवड मधील पवना, इंद्रायणी आणि मुळा नद्यांच्या निळ्या पूररेषेत झालेली अधिकृत तसेच अनधिकृत बांधकामे हा मुख्य प्रश्न आहे. यासाठी आमदार शंकर जगताप यांच्या माध्यमातून वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दि 25 मार्च 2025 रोजी (लक्षवेधी सूचना क्रमांक 1946 )मांडतांना उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे समिती नेमण्याची मागणी केली होती. दरम्यान नुकत्याच झालेल्या पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांच्या प्रचारार्थ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले होते. 10 जानेवारी 2026 रोजी आकुर्डी येथे झालेल्या सभेमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भात नव्याने सर्वेक्षण केले जाईल असे सांगितले होते. याबाबतीत आमदार शंकर जगताप यांनी पाठपुरावा सुरूच ठेवला होता. या पाठपुरावाला मोठे यश मिळाले आहे.



आमदार शंकर जगताप म्हणाले शासनाकडून राज्यातील नद्यांलगतच्या निळ्या व लाल पूररेषांचे नव्याने पुन:सर्वेक्षण करण्यात येणार आहे. नगर विकास विभागाचे उपसचिव प्रणव करपे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. निळ्या आणि लाल पूर रेषेचा प्रश्न युनिफाईड डीसीपीआर मुळे निर्माण झाला आहे. यामुळे नदीलगतच्या अनेक भागांमध्ये नवीन डेव्हलपमेंट थांबलेली आहे. निळी आणि लाल पुरेषा ही शंभर वर्षांपूर्वीच्या गृहीतकांवर आधारित आहे. त्यामुळे यामध्ये बदल होणे, नव्याने सर्वेक्षण होणे आवश्यक होते. यासाठी वेळोवेळी मागणी केली. या मागणीनुसारच समिती गठीत केली जाणार आहे. या समितीमध्ये नगरविकास, जलसंपदा, पर्यावरण आणि मदत व पुनर्वसन विभागाचे अपर सचिव, प्रधान सचिव किंवा सचिव यांचा सहभाग आहे. तसेच नाशिक येथील 'मेरी' संस्थेचे महासंचालक संजीव टाटू, पुण्यातील नगररचना विभागाचे संचालक आणि सहसंचालक, पिंपरी चिंचवड कोल्हापूर आणि चंद्रपूर या महापालिकांचे आयुक्त महाड आणि कुळगाव बदलापूर नगर परिषदांचे मुख्याधिकारी यांचा समावेश आहे.

## दोन महिन्यात अहवाल देणार

ही समिती राज्यातील ज्या शहरांमध्ये निळ्या आणि लाल पूररेषेचा विषय अडचणीचा ठरत आहे अशा ठिकाणी नव्याने सर्वेक्षण करण्याचे व पुरामुळे। बाधित होणारे क्षेत्र आणि जीवित व मालमत्तेचे होणारे नुकसान याबाबत सरकारला उपाय सुचवणार आहेत. पूर्वाधित क्षेत्रातील बांधकामांची संख्या, बांधकामांची जोते पातळी, नदीची वहन क्षमता, प्रवाहाची दिशा व तांत्रिक मुद्द्यांचा विचार करून सरकारला ही समिती अभिप्राय देणार आहे. समितीने परिस्थिती नुसार माहिती तज्ञ,संस्था यांच्यासमवेत वेळोवेळी बैठक घ्यायची आहे तसेच आवश्यक त्या शिफारशी तयार करून अहवाल दोन महिन्यांमध्ये सरकारला मान्यतेसाठी सादर करायचा आहे.

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून नागरिकांच्या हिताचे आणि सुविधेचे निर्णय घेतले जात आहे. निळ्या, लाल पूररेषांचे पुन:सर्वेक्षण हा त्यापैकीच एक निर्णय आहे. 10 जानेवारी रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी 'फ्लड मेटिगेशन मेजर्स' नुसार कोल्हापूरच्या धर्तीवर नवा युडीसीपीआर केला जाईल असे आश्वासन दिले होते. महिन्याभरात या आश्वासनाची पूर्तता होत आहे.

निळ्या आणि लाल पूररेषांबाबत शासनाने पुन:सर्वेक्षणासाठी समिती गठीत करण्याचा घेतलेला निर्णय हा पिंपरी-चिंचवडसह राज्यातील नागरिकांसाठी दिलासा देणारा आहे.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नामुळे बांधकाम परवानग्या, पुनर्विकास आणि मालमत्ता धारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. नव्या सर्वेक्षणामुळे नियमांमध्ये सुस्पष्टता येऊन नागरिकांचा संभ्रम दूर होण्यास मदत होईल.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968